## पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पीन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७०० E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in


**प्रेस नोट** दिनांक :- ०१/०७/२०२४

# भारत देशात आजपासुन नवे फौजदारी कायदे लागु पोलीस यंत्रणा सज्ज

**भारत देशात आजपासुन नव्याने लागु झालेल्या** भारतीय न्याय संहिता, भारतीय नागरी सुरक्षा संहिता आणि भारतीय साक्ष कायदा सन २०२३ या कायदयाची परिपुर्ण अंमलबजावणी करीता नाशिक ग्रामीण पोलीस दलाने श्री.अरुन वाबळे, सेवा निवृत्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मुंबई यांना दि. २५ जुन रोजी नाशिक ग्रामीण विभाग व दि. २६ जुन रोजी मालेगांव विभाग या प्रमाणे दोन सत्रात ‘‘ **भारतीय नागरीक सुरक्षा संहिता आणि पोलीस** ’’ असे प्रशिक्षण आयोजीत करण्यात आले होते.

नाशिक ग्रामीण दलातील ४० पोलीस ठाणेचे व उपविभागीय पोलीस कार्यालयाचे तसेच शाखा यांचे प्रभारी अधिकारी तसेच तेथे कार्यरत असलेल्या दुय्यम अधिकारी असे व अमलदार अशा १७७ अधिकारी व २६१७ अंमलदार यांनी प्रशिक्षण पुर्ण केले आहे.

त्याच प्रमाणे सामन्य जनतेत सदर कायदयाबाबत जनजागृती करणे करीता नाशिक ग्रामीण जिल्हयात प्रत्येक पोलीस ठाणे स्तरावर जनजागृती मोहिम, रॅली, सार्वजनीक ठिकाणी कार्यशाळा तसेच शाळा व महाविद्यालये या ठिकाणी व्याख्याणे घेवुन नविन कायदयाबाबत जनतेत जागरुकता व विश्वास निर्माण करण्याचे कार्य पुर्ण कले आहे.

जिल्हयात नविन कायदयाची प्रभारी अंमलबजावणी व जनजागृती होणे करीता पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने यांनी नागरीकांना आवाहन केले आहे.